**प्रेसनोट दि. ०४/०६/२०१८**
**ज्येष्ठ नागरिक कक्ष,पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**(Elderly Safety)(ज्येष्ठांची सुरक्षितता)**

दि.३०/५/२०१८ व ३१/०५/२०१८ रोजी नवी दिल्ली येथे फिक्की (FICCI) Federation of Indian Chambers of Commerce and Industry या संस्थेव्दारे वेगवेगळया विषयांवर सर्व राज्यातील उपक्रमांचे अनुषंगाने Smart Policing Award 2018 चे आयोजन करण्यात आलेले होते. नमुद कार्यक्रमामध्ये **(Elderly Sefty)(ज्येष्ठांची सुरक्षितता)**या विषयावरील संपुर्ण भारतामधुन महाराष्ट्र राज्यातील पोलीस आयुक्तालय, पुणे शहर सिनीयर सिटीझन सेल (ज्येष्ठ नागरिक कक्ष) या विभागाचे नामांकन झाले होते. त्या अनुषंगाने दि.३०/५/२०१८ व दि. ३१/५/२०१८ रोजी नवी दिल्ली येथील (FICCI) Federation of Indian Chambers of Commerce and Industry चे कार्यालयात बक्षीस समारंभाचे आयोजन करण्यात आलेले होते.

सदर कार्यक्रमाचे वेळी सर्व राज्याचे नामांकन झालेले प्रतिनीधी तथा मान्यवर उपस्थित होते. तसेच सदर पारितोषीकाचे वितरण मा. विजय गोयल, केंद्रीय मंत्री, नवी दिल्ली यांचे हस्ते पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे वतीने पोलीस उप आयुक्त, श्री पंकज डहाणे, गुन्हे शाखा, पुणे शहर, व पोलीस निरीक्षक स्वाती थोरात, यांनी पुणे पोलीस आयुक्तालयातील ज्येष्ठ नागरिक कक्ष, पुणे शहर या कक्षाच्या उत्कृष्ठ कामगिरीसाठी Smart Policing Award २०१८ अंतर्गत **(Elderly Safety)(ज्येष्ठांची सुरक्षितता)** चे पारितोषीक स्विकारले.

यापुर्वी पुणे पोलीस आयुक्तालयास स्मार्ट पोलीसींग अंतर्गत **बडीकॉप** या उपक्रमासाठी (FICCI) चे पारितोषीक मिळाले होते तसेच सन २०१८ यावर्षीही पुणे पोलीस आयुक्तालयाचे सलग दुस-या वर्षी (FICCI) च्या पारितोषीकावर नाव कोरले गेले आहे.

पोलीस उप आयुक्त
गुन्हे शाखा,
पुणे शहर


पुणे शहर पोलीस